पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – १३

**सभावृत्तांत**

**दिनांक - १५/०६/२०२१** **वेळ - दुपारी २.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची **पाक्षिक** सभा **मंगळवार** दिनांक **१५/०६/२०२१** रोजी दुपारी **२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे काही सन्मा.सदस्य सभागृहात उपस्थित होते तर काही सन्मा.सदस्य ऑन लाईन पध्दतीने सहभागी झाले होते.

**१. मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे - सभापती**
२. मा.अनुराधा गणपत गोरखे
३. मा.सुनिता हेमंत तापकीर
४. मा.सोनवणे शारदा हिरेन
५. मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर
६. मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे
७. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
८. मा.अँड.भोसले सचिन सुरेश

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.बोदडे – सहाय्यक आयुक्त हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------------

**उपस्थित सन्मा.सदस्य यांचे संमतीने खालील ऐनवेळचा विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आला.**

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास योजनेमध्ये समाविष्ट क्षेत्राचे झोनिंगमध्ये बदल करणेबाबत – मा.प्रा.सोनाली गव्हाणे, मा.अनुराधा गोरखे यांचा प्रस्ताव.

----------

अ) मा.शहर सुधारणा समिती सभा (कार्यपत्रिका क्रमांक ११) दि.०६/०४/२०२१ व ०४/०५/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) मा.शहर सुधारणा समिती सभा (कार्यपत्रिका क्रमांक १२) दि.०४/०५/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला.**

ठराव क्रमांक – १९ विषय क्रमांक - ०१

दिनांक – १५/०६/२०२१

सुचक : मा.प्रा.सोनाली गव्हाणे अनुमोदक : मा.अनुराधा गोरखे

संदर्भ – मा.प्रा.सोनाली गव्हाणे, मा.अनुराधा गोरखे यांचा प्रस्ताव –

मौजे चोविसावाडी, येथील गट नं.९२ यांसी क्षेत्र ९८ आर महाराष्ट्र राज्य शासन नगर विकास विभाग यांचेकडील अधिसुचना क्र.टी.पी.एस.१८०५/१०५०/प्र.क्र./६९५/०५/१३ दिनांक ०३/०५/२००८ व महाराष्ट्र राज्य शासन नगर विकास विभाग, यांचेकडील अधिसुचना क्र.टी.पी.एस.१८०८/८८४/सी.आर.१८८७/नवि/१९दि.१८/०८/२००९ नुसार पिं.चिं.महानगरपालिकेच्या विकास योजनेमध्ये हरित विभाग ग्रीन झोन मध्ये समाविष्ट केलेले आहे. यांच गटातील एकूण क्षेत्रापैकी जवळपास ८०% क्षेत्र निवासी झोन मध्ये असून जवळपास १०% इतके क्षेत्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ८१ नुसार संपादित क्षेत्रात फेरफार करणे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ मा.आयुक्तास सार्वजनिक हितासाठी रस्ते संपादित करणेनुसार महानगरपालिकेच्या १८ मी. सार्वजनिक रस्त्यासाठी संपादित केले आहे. संपादित क्षेत्राची नुकसान भरपाईची रक्कम संबंधित जमीनधारकांनी अद्याप पर्यंत स्विकारली नाही. विकास योजनेमध्ये गट क्र.९२ यांसी क्षेत्र ९८ आर हे क्षेत्र ग्रीन झोन मध्ये दर्शविले आहे. यालगतचे क्षेत्र निवासी झोन मध्ये आहे. ग्रीन झोन मध्ये दर्शविले क्षेत्र खडकाळ व मुरुम असून नदी, नाले, डोंगर, द-या मध्ये नाही. सदरचे क्षेत्रापैकी १८ मीटर रस्ता रुंदी निवासी झोन मधील क्षेत्र महापालिकेने संपादित केलेले आहे. त्यामुळे संबंधित जमीनधारकांचे आर्थिक नुकसान झाले आहे. सदरचे संपादीत रस्त्यामुळे नागरिकांच्या सोयी होऊन या ठिकाणी मोठे गृहप्रकल्प उभारलेले आहे. त्यामुळे महापालिकेच्या तिजोरित कराचे रुपाने मोठी भर पडत आहे. तरी सदर प्रकरणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ८१ नुसार संपादित क्षेत्रात फेरफार करणेबाबतचा विचार करुन म.न.पा.विकास योजनेमध्ये दर्शविलेले गट नं.९२ मधील ग्रीन झोन चे क्षेत्र निवासी झोन मध्ये बदल करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे )**
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३०६/२०२१
दिनांक : १५/०६/२०२१

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.